**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ३१ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.**
2. **अहिल्यादेवींची महती देशातील सर्व भाषिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनावर बहुभाषिक चित्रपट निर्माण केला जाणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा.**
3. **'विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत नागपुर जिल्हयातील तब्बल 180 गावांमध्ये जनजागृती रथाद्वारे शेतकऱ्यांना दिली जात आहे माहिती.**
4. **औद्योगिक विकास विदर्भकेंद्रीत असावा- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे 'ॲडव्हांटेज विदर्भ-2025'च्या अहवालाच्या प्रकाशनाप्रसंगी प्रतिपादन.**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची आज गरज आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज भोपाळ इथं आयोजित 'देवी अहिल्यादेवी होळकर महिला सशक्तीकरण महासंमेलनात' बोलत होते. अहिल्यादेवींचं नाव ऐकताच मनात श्रद्धाभाव निर्माण होतो आणि कोणत्याही कठीण परिस्थितीत राज्य, कसं पुढे न्यायचं हे त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे, असं ते यावेळी म्हणाले. अहिल्यादेवींनी एक उत्तम प्रशासक आणि लोकशाहीचं उत्तम प्रमाण सादर केलं. जलसंवर्धनाचं महत्व अधोरेखित करत त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचा उद्धार केला आणि तीनशे वर्षांपूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात सशक्त राज्य उभारत स्त्री शक्तीचा समाजासमोर आदर्श ठेवला, असं पंतप्रधान म्हणाले. अहिल्याबाईंच्या स्मरणार्थ आज एका टपाल तिकिटाचं आणि विशेष नाण्याचंही मोदी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. तसंच अनेक प्रकल्पांचं आणि योजनांचं लोकार्पण यावेळी करण्यात आलं. तर इंदूरच्या मेट्रो स्थानकाचं त्यांनी यावेळी दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन केलं.**

---

चौंडी कार्यक्रम

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत चौंडी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अहिल्याबाई होळकर हे ऊर्जा केंद्र असून तसेच ते प्रेरणा देणारे केंद्र आहे. अहिल्यादेवींची महती देशातील सर्व भाषिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनावर बहुभाषिक चित्रपट निर्माण केला जाणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी फडणवीस यांनी होळकर यांच्या जलव्यवस्थापन तसेच वास्तुशास्त्राच्या ज्ञानाचे महत्व अधोरेखित केले.

*(होल्ड बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 42 सेकंद)*

*संपूर्ण देशात त्यांनी मोठ्या प्रमाणात काम केलं, पण महाराष्ट्रातही अनेक घाट बांधले. अनेक विहिरी बांधल्या. आपण जर अहिल्यादेवींच्या काळातल्या विहिरी बघितल्या त्याला पायऱ्या आहेत. ती अशी बावळी आहे की ज्याचं पाणी आटत नाही आणि अनेक तर देशामध्ये अशा ठिकाणी आहेत की आसपास दुष्काळ आहे, पण त्या विहिरीला पाणी आहे. अशा प्रकारच्या पुण्यश्लोक अहिल्या मातेने तयार केलेल्या विहिरी असतील, तलाव असतील, घाट असतील याचं संवर्धन करण्याचा निर्णय आपण घेतला आणि चांदवड असेल, त्रंबकेश्वर असेल, मल्हार गौतमेश्वर असेल, इथले जे तलाव आहेत त्याचं संवर्धन करण्याचा निर्णय आपण घेतला.*

अहिल्यादेवी यांच्या त्रिशताब्दी जन्म सोहळ्याला पंतप्रधान आणि राष्ट्रपती हे येऊ शकले नाही मात्र आगामी काळात ते या ठिकाणी येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्म सोहळ्याच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे चौंडी येथे आयोजन करण्यात आले.पहाटे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.यानिमित्ताने जन्मभूमी ते कर्मभूमी म्हणजेच चौंडी ते इंदौर या बस सेवेचा प्रारंभ करण्यात आला.

-----------------------------------------

बहुपक्षिय शिष्टमंडळ

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षिय शिष्टमंडळ वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत. काँग्रेस खासदार शशि थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज कोलंबियाच्या परराष्ट्र व्यवहार उपमंत्री रोझा योलांडा व्हिलाविचेंसिओ यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान पाकिस्तानबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या कोलंबियाच्या विधानावर थरूर यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र

भारताच्या भूमिकेला कोलंबियानं पाठिंबा दिला असून हे विधान मागे घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं सिएरा लिओनचा दौरा पूर्ण केला. शिष्टमंडळाने संसदेचे सभापती, उपसंरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा समन्वयक, यांच्यासह सिएरा लिओनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं लाटवियामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला.

------------------------------------

विकसित कृषी संकल्प अभियान

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी 29 मे रोजी ओडिशातील पुरी येथून 'विकसित कृषी संकल्प अभियानाचा' शुभारंभ केला तर याचा राज्यस्तरीय शुभारंभ परभणीतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय आणि भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) यांचा हा उपक्रम म्हणजे भागीदारी, वैज्ञानिक नवोपक्रम आणि देशासाठी सुरक्षित अन्न भविष्य सुनिश्चित करून तळागाळातील पातळीवर भारतीय शेतीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. १५ दिवसांच्या मोहिमेदरम्यान चौहान सुमारे २० राज्यांचा प्रवास करतील. शिवराज सिंह म्हणाले की, या व्यापक मोहीमे अंतर्गत 'प्रयोगशाळेपासून जमिनीपर्यंत' जोडण्यासाठी, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ प्रत्येक गावात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.याच अनुषंगाने केंद्र सरकारच्या वतीने नागपुर जिल्हयातील तब्बल 180 गावांमध्ये 'विकसित कृषी संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.या अभियानातंर्गत शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी नागपुर जिल्हयातील गावागावांमध्ये जनजागृती रथ फिरविला जात आहे. सावनेर तालुक्यातील नंदापूर येथे कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी तर्फे आयोजित कार्यशाळेत महाराष्ट्र पशु व मत्स विद्यापीठ, नागपुर चे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाणे यांच्यासह भारतीय कृषि अनुसंधान परिषद, कृषी विज्ञान केंद्र, आत्मा, आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, अधिकारी सहभागी झाले होते. या अभियानाविषयी माहिती देत आहेत डॉ.अनिल भिकाणे

*(होल्ड बाईट -डॉ. भिकाणे 36 सेकंद)*

*या अभियानाला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय आणि या अभियानातून शेतकर्यांना विद्यापीठातील आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषदेतील नवनिर्मित*

*तंत्रज्ञान त्यांच्याकडे पोचवण्याचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने चालू आहे. शासनाच्या केंद्र शासन असेल, महाराष्ट्र शासनाच्या ज्या कृषी विषयक योजना आहे त्याही लोकांपर्यंत कृषी खातं पोहोचवण्याचा या मार्फत प्रयत्न करत आहे. आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांनी जी प्रगतीशील शेतकरी आहे, त्यांच्या गोठ्यांना त्यांच्या शेतीलाही बऱ्याचं वेळा आमची शास्त्रज्ञ भेट देत आहेत आणि नवतंत्रज्ञानाचा कसा त्यांनी स्वीकार केला हे जाणून घेत आहेत.*

दरम्यान नंदापूर सावनेर येथील शेतक-याने या अभियानाच्या लाभाबद्दल प्रतिक्रीया दिली

*(होल्ड बाईट -शेतकरी 16 सेकंद)*

*तळागाळातीलं जी माहिती आहे ती या येणारे जे लोक आहे कृषी संकल्प अभियान अंतर्गत ज्या लोकांना नवीन नवीन लोकांनी आम्हाला नवीन नवीन माहिती दिली, पशुसंवर्धनबद्दल माहिती दिली, पाण्याबद्दल माहिती दिली, पिकाबद्दल माहिती दिली. आयात-निर्यात धोरणाबद्दल जी माहिती दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे धन्यवाद करतो.*

-------------------------------------

गडकरी कार्यशाळा

दोन वर्षांपासून एआयडीच्यावतीने 'अडव्हान्टेज विदर्भ' चे यशस्वीरित्या आयोजने केले जाते. विदर्भाचा औद्योगिक विकास व्हावा, हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. हा विकास विदर्भकेंद्रीत व्हावा यासाठी एआयडीने जिल्हा, तालुकास्तरावरील विविध औद्योगिक क्षेत्रातील चांगल्या उद्योजकांना यात प्रवाहात जोडावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री आणि 'अडव्हांटेज विदर्भ'चे प्रणेते नितीन गडकरी यांनी केले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) च्यावतीने फेब्रुवारी महिन्यात यशस्वीरित्या आयोजित केलेल्या 'अडव्हांटेज विदर्भ- 2025 - खासदार औद्योगिक महोत्सव'च्या अहवालाचे प्रकाशन एनरिको हाईट्स येथील सभागृहात आज गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. नवकल्पनांना तंत्रज्ञानाची जोड देऊन ग्रामीण भागापर्यंत विकासाची गंगा पोहोचवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करताना नितीन गडकरी यांनी भविष्यात नागपुरात येऊ घातलेल्या ग्लोबल स्कील डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ तयार करता येईल, असे सांगितले. त्याने रोजगार दुपटीने वाढेल व विदर्भाचा तितक्याच वेगाने विकास होईल, असे ते म्हणाले.

-------------------------------------

सुखकर्ता नगरी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज हिंगणाच्या मौजा कान्होळी गाव येथे सुखकर्ता नगरीचे उद्घाटन आणि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरांचे वाटप योजनेचा शुभारंभ आज झाला . यावेळी गडकरी यांनी वर्धा रोड वर होत असलेल्या विकासासंदर्भात माहिती दिली.

*(होल्ड बाईट -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 29 सेकंद)*

*मला अतिशय आनंद आहे कि, सध्या वर्धा रोडच्या दोन्ही बाजूला विकास गतीने होतो आहे आणि म्हणून या ठिकाणी येणारा जो नॅशनल हायवे आहे तोही आता फोरलेनचा सिक्सलेन करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे त्याचेही काम सुरु झालेल आहे . नागपूरची मेट्रो पण आता बुटीबोरीपर्यंत येणार आहे. त्याचेही काम सुरु झालेल आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आपल्याला सगळ्या सुविधा याठिकाणी प्राप्त होतील. याच भागातून जर रस्ता झाला तर मी अंडरपास टाकून देईल म्हणजे तुम्हाला इतका फिरून येण्याची गरज पडणार नाही.*

---------------------------------------

जनसंवाद कार्यक्रम

राज्याचे महसूल मंत्री आणि नागपूर चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या ३१ मे रोजी रविवारला जिल्हा नियोजन भवन आणि हुडकेश्वर व नरसाळा येथे जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे नागपूर येथे सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत नागरिकाना भेटतील. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची लेखी निवेदने स्वीकारतील. त्यानंतर दुपारी ३ ते ६ या वेळेत हुडकेश्वर व नरसाळा, हनुमान मंदिर मैदान, पाण्याच्या टाकीजवळ, चंद्रभागानगर, हुडकेश्वर मेन रोड येथे जनसंवाद कार्यक्रम होईल.यावेळी दोन्ही ठिकाणी पालकमंत्री बावनकुळे नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील.

---------------------------------------

हवामान

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये आजपासून पुढील 4 दिवस तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. आज सर्वात जास्त तापमानाची नोंद भंडारा आणि नागपूर येथे 37 अंश सेल्सिअस करण्यात आली आहे.

---------------------------------------